# उल्हासनगर महानगरपालिका

जा. क्र./उमपा/करवि/यु.८/३२/२३
दिनांक २६/०५/२०२३

विषयः- मालमत्ता क्र. 56DI021318700 [Old No. 56/0002] करीता करयोग्य मुल्य व कर आकारणी निश्चित करणेबाबत.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 56DI021318700 [Old No. 56/0002] [On Plot Main Bazar Shop 111A-B, Ulhasnagar-5] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीककरीता मालमत्ता कर देण्यास प्रथम पात्र व्यक्ती Madhavdas Murpani (Axis Bank ATM] अशी नोंद आहे. संदर्भित मिळकतीचा तपशिल खालिलप्रमाणे होता.

| Const. Type | Occu. Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Tenant | Non Residential | 115200 | 01-APR-91 | 100 | 0 | 100 |

जा.क्र./उमपा/करवि/विकनि/०३/१७ दिनांक १८/०८/२०१७ रोजी भाडे करारनामा सादर करणेबाबत शाखा प्रबंधक, एक्सीस बॅक, ईगल हॉटेल तळ मजला, ऍक्सीस बॅके फर्नीचर बाजार रोड, उल्हासनगर-३ यांना पत्राद्वारे कविण्यात आले होते.

त्याअनुषंगाने श्री. आनंद एम. मुरपानी/सुंदर एम. मुरपानी व AGS Transact Telchnologies Limited यांचे दरम्यान दि. २५/०९/२०१५ रोजी करण्यात आलेल्या भाडे करारनामेची प्रत सादर केली आहे.

सदरहु मिळकतीमध्ये भाडेकरू (ऍक्सीस बॅक लि.) वापर करीत असल्याने श्री. विजय मंगलानी, विशेष कर निरीक्षक यांचेमार्फत वर्ष २०१५–१६ ते २०१७–१८ या कालावधीत भाडे करारानुसार करयोग्य मुल्य व आकारणी निश्चित करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने संदर्भित मिळकतीचे १०० चौ. फुट क्षेत्राकरीता वर्ष २०१५–१६ ते वर्ष २०१७–१८ पर्यत रू. १४,४००/– प्रतिमाह भाडे गृहीत धरून कर आकारणी निश्चित करण्यात आलेचे दिसुन येत आहे. मिळकतीचा तपशिल खालिलप्रमाणे आहे.

| Const. Type | Occu. Status | Usage | Annual Rent | Asst. Year | Total Area | Exempted Area | Assessable Area |
|---|---|---|---|---|---|---|---|
| RCC | Tenant | Non Residential | 172800 | 01-APR-91 | 100 | 0 | 100 |

संदर्भित मिळकती करीता दि. ८/११/२०१७ रोजी स्पेशल नोटीस बजावण्यात आली आहे.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५०-अ नुसार संदर्भित मिळकतीकरीता भाडे करारानुसार वर्ष २०१५–१६ पासुन वाढीव भाडे व क्षेत्रफळ गृहीत धरून मिळकतीचे करयोग्य मुल्य व आकारणी सुधारीत करून वर्ष २०१७--१८ करीता बिल बजावण्यात आले आहे.

संदर्भित मिळकती करीता श्री. आनंद मुरपानी रा. बॅरेक नं. २०७१ ते बॅरेक नं. २०४६ मागे, जुने पोस्ट ऑफिस रोड, डावी बाजु, उल्हासनगर-५ यांनी दि. २१/६/२०१८ रोजीचे पत्रान्वये ऍक्सीस बॅक ए.टी.एम. असलेला शॉप हा वर्ष २०१८--१९ मध्ये रस्ता रूंदी करणात तुटला असल्याने त्यावर आकारण्यात आलेली टॅक्स पावती रद्द करणेस विनंती केली आहे.

सदर प्रकरणी श्री. आनंद माधवदास मुरपानी यांनी उल्हासनगर महानगरपालिके विरूध्द याचिका क्र. १५९७/२०१८ अन्वये मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दावा दाखल केला असुन सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे दिसुन येत आहे. याबाबत दि. ०२/०२/२०१८ रोजीचे विधी विभागामार्फत पत्र प्राप्त झाले आहे. सोबत प्रत जोडली आहे.

संदर्भित मिळकतीचे वर्ष २०२२—२३ करीता चालुमागणीसह एकुण रक्कम रू. १५,४०,२००/— इतकी थकीत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४८५ (१) नुसार या अधिनियमान्वये किंवा कोणताही नियम, विनियम, उपविधी किंवा स्थायी आदेश या अन्वये काढलेल्या कोणत्याही आकारणीत किंवा कोणत्याही अटकावणीत किंवा केलेल्या जप्ती किंवा काढलेल्या कोणत्याही नोटीशीत, बिलात, अनुसूचीत, समन्समध्ये किंवा अन्य दस्तऐवजात कोणताही उपचार दोष, लेखन, प्रमाद, वर्जन किंवा अन्य दोष असल्यास ते कोणत्याही वेळी, शक्य असेल तेथवर दुरूस्त करता येईल. अशी तरतुद आहे.

सबब, अधिनियमाचे कलम १५०-अ, कलम ४८५ (१) नुसार उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात करपात्र मालमत्ता क्र. 56DI021318700 [Old No. 56/0002] करीता भाडे करारानुसार वर्ष २०१५-१६ पासुन ते पासुन २०१७—१८ पर्यंत मिळकतीचे करयोग्य मुल्य कायम ठेवून दिनांक २२/०९/२०१७ पासुन भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली नोंद रद्द करून वर्ष २०२३-२०२४ करीता सुधारीत बिल बजावणेसाठी शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १५०-अ, कलम ४८५(१) नुसार मधील तरतुदीच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. 56DI021318700 [Old No. 56/0002] अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता भाडे करारानुसार वर्ष २०१५-१६ पासुन २०१७-१८ पर्यंत मिळकतीचे करयोग्य मुल्य कायम ठेवून दिनांक २२/०९/२०१७ पासुन भाडोत्री गृहीत धरून करण्यात आलेली नोंद रद्द करून वर्ष २०२३-२०२४ करीता सुधारीत बिल बजावण्यात यावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,

१) मे. कोल्ब्रो, ग्रुप, योग्य त्या कार्यवाहीसाठी

२) श्री. आनंद माधवदास मोरपानी/सुंदर माधवदास मोरपानी रा. शॉप नं. १११, ए. बी. तिलक चौक, उल्हासनगर-५